# श्री समर्थ रामदास स्वामी
## आणि
# श्री छत्रपति शिवाजी महाराज
# यांचा अन्योन्यसंबंध
## भाग १

प्रास्ताविक निवेदनः—कोणत्याही एकाद्या ऐतिहासिक वादग्रस्त प्रश्नाची नूतन चर्चा करावयाची झाल्यास त्या प्रश्नासंबंधीं मूळ वाद कसा उपस्थित झाला, त्याविषयीं वाद करणाऱ्या निरनिराळ्या व्यक्ति, चर्चा करण्यास कोणत्या हेतूनें उद्युक्त झाल्या व चर्चा करणाऱ्या निरनिराळ्या व्यक्तींनीं कोणत्या स्वरूपाचीं वादग्रस्त प्रश्ना संबंधीं मतें व्यक्त केलीं इत्यादि बाबींचा त्रोटक पूर्वेतिहास दिल्या खेरीज नूतन चर्चेचें वैशिष्ट्य व महत्त्व वाचकांच्या लक्षांत बरोबर रीतीनें येऊं शकत नाहीं. श्रीसमर्थ रामदास स्वामी आणि श्रीछत्रपति शिवाजी महाराज यांच्या अन्योन्य संबंधा विषयीं, प्रस्तुत प्रबंधांत आम्हीं चर्चा करण्याचें ठरविलें असल्यामुळें आतां दर्शविलेल्या कारणास्तव समर्थशिवाजीसंबंधाविषयींचा वाद मूळ कसा उपस्थित झाला, या विषयीं चर्चा कोणकोणीं केली, झालेल्या चर्चेचें स्वरूप कोणत्या प्रकारचें आहे इत्यादि बाबींचें सुरवातीस च आम्ही थोडक्यांत दिग्दर्शन करितों.

ऐतिहासिक दृष्ट्या वरील प्रश्न संबंधीं चर्चा अलीकडे महाराष्ट्रांत उपस्थित होण्या पूर्वी रामदासी सांप्रदाया संबंधीं फार पूर्वी पासून चालत आलेला एक प्रवाद आम्ही येथें नमूद करून ठेवितों. वारकरी सांप्रदायाच्या भजन अगर निरूपण प्रसंगीं, त्याच प्रमाणें वारकरी सांप्रदायी लोकांच्या भोजनप्रसंगीं रामदासांचीं वचनें निरूपणकारानें प्रमाणादाखल सांगूं नयेत अगर भोजन करणारानें ह्मणूं नयेत असा वारकरी सांप्रदायाचा शिष्टाचार असल्याचें ऐकिवांत आहे. समर्थवचनां वर हा बहिष्कार समर्थांनीं राजगुरुत्व पत्करिल्या मुळें घालण्यांत आला असें वारकरी सांप्रदायिकांचें म्हणणें आहे. राजगुरुत्व पत्करणें वारकरी सांप्रदायाच्या तत्त्वाशीं विरोधक आहे, ही भावना या बहिष्काराच्या बुडाशीं आहे. या प्रवादा खेरीज रामदासी सांप्रदाया विषयीं पूर्वापार चालत आलेला असा दुसरा कांहींएक प्रवाद नाहीं. ही गोष्ट

लक्षांत घेतली असतां समर्थशिवाजीसंबंधाविषयीं वाद अलीकडे उपस्थित होईतोंपर्यंत, पूर्व ग्रंथांतरीं या विषयींचे आढळण्यांत येणारे अनेक उल्लेख कोणता हि पूर्वग्रह मनांत बाळगून करण्यांत आलेले नाहींत असें समजून चाललें पाहिजे. शंभर सवाशें वर्षां पूर्वींच्या उल्लेखांत नमूद असलेल्या गोष्टी सकृद्दर्शनीं खऱ्या समजून चालणें व त्या खऱ्या नाहींत असें कोणाचें म्हणणें असेल तर पुराव्यानें तें सिद्ध होईपर्यंत त्या खऱ्या समजून ग्राह्य धरणें, हें धोरण या प्रश्नाविषयींच्या वादांत कोणत्याही समंजस माणसास स्वीकारणें जरूर आहे.

महाराष्ट्रांत समर्थशिवाजीसंबंधाविषयीं वाद मूळ कसा उपस्थित झाला याचें आम्ही प्रथम दिग्दर्शन करितों. कै० विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड पहिला इ. स. १८९८ सालांत छापून प्रसिद्ध केला. त्या खंडास त्यांनीं जोडलेल्या विस्तृत प्रस्तावनेंत वारकरी सांप्रदायी संतां विषयीं खालील उद्गार काढिले आहेत:—

" महाराष्ट्रेतर प्रांतांतील हिंदुधर्मास सहिष्णु हिंदुधर्म म्हटल्यास व महाराष्ट्रांतील हिंदुधर्मास जयिष्णु हिंदुधर्म म्हटल्यास या दोन्ही धर्मांतील भेद उत्कटत्वेंकरून स्पष्ट होईल. दामाजी पंतांच्या वेळचा स्तब्ध विठोबा, सहिष्णु हिंदुधर्माची मूर्ति आहे व समर्थांचा उड्डाण करणारा मारुति जयिष्णु हिंदु-धर्मांची पताका आहे. "

याप्रमाणें राजवाड्यांनीं व्यक्त केलेला अभिप्राय वारकरी सांप्रदायी संताभिमानी मंडळीस अप्रिय झाला. याच सुमारास अगर या पूर्वीं कांहीं वर्षें कै० न्यायमूर्ति रानडे मुंबईस भागवत धर्मा वर व्याख्यानें देत होते. त्या व्याख्यानांत वारकरी सांप्रदायी संतांची शिकवण महाराष्ट्राच्या अभ्युदयास कशी कारणीभूत झाली याविषयींचें विवेचन ते करीत असत. त्या नंतर थोड्याच दिवसांनीं " मराठी सत्तेचा उत्कर्ष " " Rise of the Maratha Power हा कै० रानड्यांचा ग्रंथ छापून प्रसिद्ध झाला. त्या ग्रंथांत मराठ्यां-च्या सत्तेच्या उत्कर्षास अनुकूल भूमि, महाराष्ट्रांतील वारकरी सांप्रदायाच्या संतांनीं कशी तयार केली याचें दिग्दर्शन न्या० मू० रानडे यांनीं एका स्वतंत्र भागांत केलें आहे. यानंतर थोड्याच दिवसांनीं कै० राजवाडे यांनीं मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड चवथा प्रसिद्ध केला; व त्या खंडास त्यांनीं जोडिलेल्या विस्तृत प्रस्तावनेंत महाराष्ट्रधर्म या विषयाची त्यांनीं फिरून चर्चा केली. ही चर्चा पहिल्या खंडांतल्या प्रस्तावनेंतील वर नमूद

केलेल्या चर्चे इतकी च विस्तृत असून वारकरी संप्रदायांतलि संतांविषयीं राजवाड्यांनीं व्यक्त केलेला अभिप्राय फार कटु आहे.

वारकरी संतां विषयीं त्यांनीं व्यक्त केलेल्या मताचें यथार्थ स्वरूप वाचकांच्या लक्षांत येण्या करितां आह्मी त्या चर्चेतील जरूर तेवढा उतारा येथें देतों:—

" बाराव्या शतकाच्या सुमारास जैन धर्माच्या विरुद्ध लिंगायतांचा पंथ व मानभावांचा पंथ महाराष्ट्रांत सुरू झाला. जैनांच्या, लिंगायतांच्या व मानभावांच्या संसर्गानें सनातन धर्माच्या गोटांतील लोकांच्या हि मना वर कांहीं परिणाम झाले व त्यां पैकीं कांहींनीं भक्तिमार्ग, उपासनामार्ग या नांवा खालीं मोडणारी सनातन धर्माची एक निराळीच शाखा स्थापिली. या च शाखेला संत मंडळींचा अथवा संताळ्यांचा भाक्तिपंथ ह्मणून ह्मणतात. जैन, लिंगायत व मानभाव यांच्यांत कमजास्त प्रमाणानें जातिभेद व्यवहारांत मानीत नाहींत. संताळ्यांत विठोबाच्या मंदिरांत तेवढा जातिभेद मानीत नाहींत, व्यवहारांत मानितात. ह्या भक्तिपंथाची स्थापना महाराष्ट्रांत तेराव्या शतकांत झाली. संताळ्यांची ही स्थापना झाल्या वर कांहीं कालानें देवगिरी येथील मराठ्यांचें राज्य नष्ट झालें व यवनांची सत्ता महाराष्ट्रांत तनिशें वर्षें ह्मणजे शके १२४० त देवगिरी घेतल्यापासून शके १५४० त अहमदनगरची मनसबगिरी शहाजीला मिळे तोंपर्यंत बहुतेक अव्याहत चालली. या तीन शतकांत संताळ्यांचें च प्राबल्य महाराष्ट्रांत फार होतें. संत ह्मटला ह्मणजे अत्यंत पंगुपणाचा केवळ मूर्तिमंत पुतळा च! संताला खाणें नको, पिणें नको, वस्त्र नको, प्रावरण नको, कांहीं नको; एक विठोबा मिळाला ह्मणजे सर्व कांहीं मिळालें. ऐहिक सुखदु:खें, ऐहिक उपभोग, ऐहिक व्यवहार यांच्यांत मन घालणें संतांचें काम नव्हे, इहलोक हा संतांचा नव्हे च. राजा कोणी असो, सारा कोणी घेवो, संताला त्याचें कांहीं नाहीं. असल्या ह्या संतमंडळीच्या हातीं विचाराची दिशा जाऊन महाराष्ट्र तीनशें शतकें पंगु बनून राहिलें. सनातन धर्माला त्रासून महाराष्ट्रांतील लोकांनीं जी धर्मक्रांति केली तिचें स्वरूप हें असें होतें. या धर्मक्रांतीनें धर्मोन्नति, राष्ट्रोन्नति होण्याचें एकीकडे च राहून उलट धर्मावनति व राष्ट्रावनति मात्र झाली. कालांतरानें यवनांच्या अमला खालीं पायमल्ली झालेली पाहून मराठ्यांचे डोळे उघडले; या पंगु संताळ्यांचा त्यांना वीट आला आणि सनातन धर्मा कडे, गोब्राह्मण प्रतिपालना कडे व चातुर्वर्ण्या कडे त्यांनीं पुन्हा धांव

घेतली. या उपरतीच्या वेळीं रामदासस्वामी, रंगनाथस्वामी, मोरयादेव वगैरे सनातन धर्माभिमानी विचारी साधु पुरुष झाले व महाराष्ट्रास महाराष्ट्रधर्माचा उपदेश करिते झाले. त्या सनातन धर्माभिमानी साधु पुरुषांच्या वेळीं संताळे आपला संथ मार्ग आक्रमित च होते. परंतु इहलोकींचे अर्थ साधण्यास संताळ्यांचा उपयोग कांहीं नाहीं हें तुकाराम पूर्णपणें जाणून होता. शिवाजी तुकारामा कडे उपदेश घेण्या करितां गेला असतां त्या प्रामाणिक साधूनें आपल्या सारख्या पंगु माणसा कडे न येतां समर्थांच्या कडे जाण्याचा शिवाजीस उपदेश केला. संताळ्यांतील पंगुत्वाला उपरोधून च समर्थ हें नांव अस्तित्वांत आलें; हें लक्षांत घेतलें असतां तुकारामाच्या उपदेशाचें महत्त्व व त्यानें स्वतः स्वीकारलेल्या पंथाचें लघुत्व कळून येईल. संताळ्यांच्या उपदेशानें महाराष्ट्रांत नवीन जोम आला म्हणून न्यायमूर्ति रानडे म्हणतात; तो खरा प्रकार नसून समर्थांनीं काढिलेल्या नवीन रामदासी पंथाच्या उपदेशानें तो चमत्कार घडून आलेला आहे; निवृत्तीकडे ज्यांचे डोळे लागले त्या संतांच्या हातून हें प्रवृत्तिपर कृत्य व्हावें कसें? " समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा भूमंडळीं कोण आहे " असली धमकी देणाऱ्या समर्थांच्या च महोपदेशाचा तो परिणाम आहे. "

वरील प्रमाणें अभिप्राय राजवाड्यांनीं व्यक्त केल्यामुळें महाराष्ट्रीय संताभिमानी लोकांचीं मनें पूर्वी पेक्षां अधिक च दुखावलीं गेलीं. वरील अभिप्रायांतील राजवाडयांचीं दोन तीन विधानें आक्षेपार्ह अशा स्वरूपाचीं आहेत. " महाराष्ट्रांत वारकरी सांप्रदायाची स्थापना झाल्यावर कांहीं काळानें देवगिरी येथील मराठ्यांचें राज्य नष्ट झालें व यवनांची सत्ता महाराष्ट्रांत तनिशें वर्षें नांदली." या वरील उताऱ्यांतील विधानांत जो कार्यकारणसंबंध व्यक्त करण्यांत आला आहे तो बरोबर नसून ऐतिहासिकदृष्ट्या त्यास पुरावा मिळणें दुरापास्त आहे. वारकरी सांप्रदायास सांप्रदायाचें रूप खुद्द ज्ञानेश्वरापासून च प्राप्त झालें. वारकरी सांप्रदायाची उपास्य देवता जी पंढरपूर येथील श्री विठ्ठलाची मूर्ति ती व त्या देवतेचें देवालय ज्ञानेश्वरा पूर्वी पासून दोन तीन शतकें अस्तित्वांत होतें. श्रीविष्णु, शंकर, गणपति, राम, कृष्ण, देवी इत्यादि देवता व त्यांचीं देवालयें ज्या प्रमाणें महाराष्ट्रांत निरनिराळ्या ठिकाणीं होतीं व या देवतांची उपासना करणारे लोक हि महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं जसे होते त्या च प्रमाणें पंढरपूर येथें श्री विठ्ठल देवता असून त्या देवतेची उपासना करणारे लोक हि महाराष्ट्रांत होते. परंतु श्री विठ्ठल ही एका विशिष्ट सांप्रदायाची उपास्य देवता समजली जात असे व त्या सांप्रदायाची विशिष्ट प्रकारचीं अशीं

## भाग पहिला

कांहीं तत्त्वें ज्ञानेश्वर महाराजां पूर्वी ठरलीं गेलीं होतीं असे ह्मणण्यास बरीक अद्याप पावेतों कांहीं एक पुरावा पुढें आलेला नाहीं. वारकरी संप्रदाया पैकीं सुप्रसिद्ध संत श्री तुकाराम महाराज यांनीं, वारकरी संप्रदायाच्या संस्थापक व अधारस्तंभ मानल्या जाणाऱ्या संतांचीं नांवें खालील अभंगांत दर्शविलीं आहेत; ह्यावरून ज्ञानेश्वराच्यापूर्वी वारकरी पंथ संप्रदायाच्या स्वरूपांत अस्तित्वांत नव्हता हें दिसून येतें:–

" संत कृपा झाली । इमारत फळा आली ।
ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिलें देवालया ।
नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार ।
जनार्दन भागवत । ध्वज उभारिला हा भागवत ।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ॥

ह्या अभंगांत ज्ञानेश्वर हे वारकरी संप्रदायाचे मूळ संस्थापक असल्याचें स्पष्टपणें नमूद केलें असल्याकारणानें, ज्ञानेश्वरापूर्वी श्री विठ्ठल देवतेच्या उपासकास संप्रदायाचें रूप प्राप्त झालें होतें व महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यास घातक अशीं या संप्रदायाचीं कांहीं तत्त्वें महाराष्ट्रीय जनतेंत पसरविण्यांत आलीं होतीं असें विधान करणें सयुक्तिक होणार नाहीं. ज्ञानेश्वराची हयात सारी एकवीस वर्षांची. त्यांत बालपणाचीं ५।६ वर्षें वजा केलीं ह्मणजे बाकी १४-१५ वर्षें राहतात. तितक्या अवधींत त्यांनीं अशा कोणत्या तत्त्वांचा प्रसार केला कीं, त्यांच्या योगानें महाराष्ट्रांतील जनता पंगु बनून तिचें स्वातंत्र्य अल्लाउद्दीन खिलजीस सहज हिरावून घेतां आलें? राजवाड्यांनीं मराठ्यांच्या इतिहासाच्या सहाव्या खंडांतलि प्रस्तावनेच्या ५१ व्या पानांतील खालील उताऱ्यांत नमूद केलेलें कारण राजवाड्यांच्या वरील सिद्धांतास पोषक ह्मणून कोणीं पुढें आणिल्यास तें कितपत टिकण्या सारखें आहे याचा हि प्रस्तुत स्थळीं विचार करणें जरूर आहे. राजवाडे ह्मणतात:–" हा महाराष्ट्रधर्म शातवाहनाच्या बाराव्या शतकाच्या अंता पर्यंत चालून पुढें ज्ञानेश्वर आले. ह्यांनीं भावार्थदीपिकेंतून इतर अनेक उत्कृष्ट तत्त्वांबरोबर खालील तत्त्व शिकविलें, व त्याचाच पगडा दुर्दैवानें किंवा सुदैवानें महाराष्ट्रांतील समाजावर उत्कटत्वानें बसला:– " उत्तमातें धरिजे। अधम तरी अव्हेरिजे! हें कांहींच नेणिजे वसुधा जेवि ॥ गाईची तृषा हरूं। कां व्याघ्रा विष पिऊनि मारूं। ऐसें नेणें चि गा करूं । तोय जैसें " ॥ १ ॥

पाणी, माती वगैरे अचेतन भूतां प्रमाणें बऱ्यावाईटाचें ग्रहण सचेतन मनुष्य-प्राण्यांनीं सुखदुःखा कडे लक्ष न देतां उदासीन बुद्धीनें करावें असें तत्त्वज्ञान ज्या देशांत नांदूं लागलें आणि " मी हे भाव नेणें । माझें कांहीं चि न म्हणे । सुखदुःख जाणणें । नाहीं जेथें " अशी भगवद्भक्तांची ममत्वरहित अचेतन वृत्ति झाली, तेथें मुसलमानांसारख्या रानटी परंतु बुभुक्षु लोकांनीं राज्य करावें व सर्वस्वापहार करावा ह्यांत कांहीं नवल नाहीं. ह्यालाच वारकऱ्यांचा एकदेशी भागवत धर्म ऊर्फ संताळे म्हणतात. " राजवाड्यांनीं वर नमूद केलेलें कारण महाराष्ट्राच्या पारतंत्र्यास खरोखर कितपत कारणीभूत झालें याचें परीक्षण करणें जरूर आहे. ज्ञानेश्वरांनीं वरील ओव्यांत जो अर्थ व्यक्त केला आहे, तो भगवद्गीतेंत ग्रंथित केलेल्या तत्त्वाचा मराठी अनुवाद आहे. भगवद्गीतेच्या बाराव्या अध्यायांत । अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रःकरुण एवच । निर्ममो निर-हंकारः समदुःखसुखः क्षमी ।। श्लो० १३ ।। या श्लोकामध्यें भगवंतांनीं आपल्या भक्तांचें वर्णन केलें आहे. या श्लोकावर ज्ञानेश्वरांनीं केलेल्या मराठी भाष्यापैकीं वरील ओव्या आहेत. ज्ञानेश्वरांनीं पूर्वी अस्तित्वांत नसलेलें नवीन तत्त्व हुडकून काढून त्याचा उपदेश महाराष्ट्रीय जनतेस केला असें म्हणतां येणें शक्य नाहीं. या दृष्टीनें विचार करितां महाराष्ट्रांतील त्या काळच्या ब्राह्मणक्षत्रियादि उच्च वर्णांतील सुसंस्कृत लोकांस जें तत्त्व पूर्वीच ज्ञात होतें त्याचा अनुवाद मराठी भाषेंत ज्ञानेश्वरांनीं केल्यानें राजेवाडे म्हणतात तशा प्रकारचा वाईट परिणाम होणें कितपत संभवनीय आहे, हा विचार करण्या-सारखा प्रश्न आहे. ज्ञानेश्वरांनीं भावार्थदीपिका हा ग्रंथ त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षी पुरा केला. त्या नंतर पांच वर्षांनीं म्हणजे त्यांच्या एकविसावे वर्षी ते समाधिस्थ झाले. या पांच वर्षांच्या अवधींत राजवाड्यांचें वरील मत ग्राह्य करावयाचें म्हणजे अखिल महाराष्ट्रीय जनतेंत या तत्त्वाचा प्रसार होऊन महाराष्ट्रीयांनीं तें तत्काळ स्वीकारलें व त्यामुळें महाराष्ट्रास पारतंत्र्य प्राप्त झालें असें मानावें लागतें. कोणत्या हि उच्च प्रकारच्या नैतिक तत्त्वाचा प्रसार मानवी समाजांत कोणत्या प्रमाणांत व किती कालांत होतो या संबंधाचा सर्व साधारण अनुभव लक्षांत घेतां, अवघ्या पांच वर्षांच्या अवधींत ज्ञानेश्वरांनीं वरील ओव्यांत ग्रथित केलेलें तत्त्व महाराष्ट्रीय जनते पैकीं बऱ्याच लोकांनीं आचरणांत आणिलें असेल असें बिलकूल संभवनीय दिसत नाहीं. प्रस्तुत काळीं असत्या-चारीपणाचें तत्त्व महात्मा गांधी भारतीय समाजांत सतत पुकारीत असतां हें तत्त्व ज्या वेळीं समाजांत पुकारलें जात नव्हतें त्यावेळे पेक्षां हि अधिक लोकांचीं

टाळकीं भरतखंडांत फुटलीं जात असून पूर्वीपेक्षां जास्त प्रमाणांत रक्ताचे पाट वाहात आहेत असा प्रत्यक्ष अनुभव या काळीं आपल्या डोळ्यांपुढें असतां राजवाड्यांचें वरील विधान कितपत सयुक्तिक मानावयाचें या विषयीं मन साशंक झाल्या खेरीज राहात नाहीं. त्या काळच्या परिस्थितीचें जरा बारकाईनें निरीक्षण केलें तर ज्ञानेश्वर काळीं महाराष्ट्रास जें पारतंत्र्य आलें तें वरील तत्त्वाच्या उपदेशा मुळें आलें नसून छत्रपति- शिवाजी, धनाजी, संताजी व त्यांचे चपळ तट्टावर भराऱ्या मारणारे अनुयायी यांस शरण येणाऱ्या उत्तर-कालीन मोगल बादशाहाचे पदरीं असणाऱ्या मुसलमान सैनिकांचे ठायीं सुख-लोलुपत्वाच्या योगानें ज्या प्रकारचें दौर्बल्य व मांद्य आलें होतें, तशा प्रकारचें दौर्बल्य व मांद्य यादव-कालीन महाराष्ट्रीय क्षत्रियांत निर्माण झाल्या मुळें आलें असें दिसून येतें. अल्लाउद्दीन खिलजीच्या वायव्य सरहद्दी पलीकडील ताज्या दमाच्या व धडाडीच्या कणखर मुसलमान सेनेच्या लाटां खालीं यादव काळची सुखलोलुप झालेली मराठी सेना बुडून गेली व महाराष्ट्राच्या पायांत परदास्याच्या शृंखला अडकल्या गेल्या असें दिसून येतें. या सर्वसाधारण कारणाखेरीज युद्धाच्या समयीं दैव हि रामदेवरावांस प्रतिकूल झालें. युद्ध होत असतां रामदेवरावांच्या कुमकेस येणाऱ्या फौजेच्या दौडीमुळें धुळीचे प्रचंड लोट उडूं लागले; हें नवीन ताज्या दमाचें सैन्य दिल्लीहून अल्लाउद्दीनाच्या कुमकेस येत आहे अशी रामदेवरावांच्या सैन्यांत वदंता उठली व त्याच्या योगानें त्यांच्या सैन्यानें कच खाल्ली. यामुळें थोड्याच वेळांत रामदेवरावांच्या सैन्याची दाणादाण उडून त्यांचा पराभव झाला व अल्लाउद्दीन खिलजी बरोबर त्यास तह करणें प्राप्त झालें. या नंतर कांहीं वर्षांनीं रामदेवराव तहाच्या अटी पाळीत नाहीं या सबबीवर दिल्लीहून मलिक काफूर याच्या प्रमुखत्वाखालीं मुसलमानांची दुसरी स्वारी देवगिरीवर होऊन तींत रामदेवरावांचा फिरून पराभव झाला, व देवगिरीचें राज्य रसातळास गेलें. राजघराणें नष्ट झालें तरी स्वारी करणाऱ्या शत्रूशीं लढत राहून आपलें स्वातंत्र्य कायम राखण्याचा प्रयत्न त्या काळच्या महाराष्ट्रीय जनतेकडून झाला नाहीं. आपली चातुर्वर्णीय समाज रचना च अशा प्रकारची आहे कीं, युद्ध करण्याचें व राष्ट्राचा बचाव करण्याचें काम पूर्व-परंपरेनें प्रामुख्यानें क्षत्रियवर्णी लोकांचें ठरलें गेलें आहे. हें काम करण्याची ऐपत बाकींच्या वर्णांच्या लोकांच्या ठायीं नसल्याकारणानें वर दर्शविलेले प्रयत्न महाराष्ट्रांतील सामान्य जनतेच्या हातून होणें शक्य नव्हतें; व त्या काळीं तशा प्रकारचे प्रयत्न महाराष्ट्रीय जनतेकडून झाले हि नाहीत. आतां अशा प्रकारचा

प्रयत्न त्या काळच्या क्षत्रिय वर्णी लोकांनीं करावयाचा. परंतु वर दर्शविल्या-प्रमाणें यांच्यांत सुबत्ता, सुखलोलुपता व ऐषआराम याच्या योगानें आलस्य व मांद्य आल्यामुळें त्यांचे हातून ही कामगिरी त्या काळीं झाली नाहीं. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत महाराष्ट्रांत जो प्रकार झाला तोच प्रकार रामदेवराव जाधवांच्या काळीं झाला असला पाहिजे असा तर्क होतो. औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धात महाराष्ट्रांत धनाजी जाधव, संताजी घोरपडे, रामचंद्र नीलकंठ अमात्य यांनीं ज्या प्रकारची जगाच्या इतिहासांत न आढळ-णारी अशी अपूर्व कामगिरी केली, तशा प्रकारची कामगिरी करण्याच्या ऐपतीचे लोक महाराष्ट्रांत निपजूं शकतात हें सिद्ध होतें. परंतु रामदेवरावांच्या कारकीर्दीत महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ अशा प्रकारचे प्रयत्न झाले नाहींत ही गोष्ट खरी आहे व ते न होण्याचें कारण वर दर्शविलेल्या स्वरूपाचें आहे. महाराष्ट्रास यादवकालीं प्राप्त झालेल्या पारतंत्र्याच्या बाबतींत राजवाड्यांची उपपत्ति कितपत सयुक्तिक आहे याची चर्चा केल्यानंतर त्यांच्या वरील अभिप्रायांतील दुसऱ्या एका बाबी विषयीं चर्चा करणें प्राप्त आहे. वारकरी सांप्रदायाची स्थापना, महाराष्ट्रीय संतांनीं श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माविरुद्ध एक प्रकारचें बंड म्हणून केली व त्याच्या योगानें पारतंत्र्यांतून आपली सुटका होण्याची कांहीं आशा राहिली नाहीं असें पाहून महाराष्ट्रीय जनता श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माकडे फिरून वळली; अशा प्रकारची विचारसरणी राजवाड्यांनीं वरील अभिप्रायांत व्यक्त केली आहे. त्या काळच्या महाराष्ट्रीय समाजाच्या इतिहासाचें जरा सूक्ष्म अवलोकन केलें असतां असें दिसून येतें कीं, वारकरी सांप्रदायाचे संस्थापक जे ज्ञानेश्वर महाराज त्यांनीं हा सांप्रदाय श्रुतिस्मृति धर्माविरुद्ध बंड म्हणून सुरू केला नसून महाराष्ट्रीय समाजांतील सुसंस्कृत ब्राह्मणादि वरिष्ठ ज्ञातींतील लोकांखेरीज बहुसंख्याक असे जे हजारों प्राकृत जन, त्यांना प्राकृतांत अध्यात्मज्ञान करून देण्याकरितां व या लोकांनीं लिंगायत, मानभाव इत्यादि श्रुतिस्मृतिधर्माशीं विरोध करणाऱ्या पंथाचा स्वीकार करूं नये हा हेतु मनांत धरून सुरू केल्याचें दिसतें. ज्ञानेश्वरांच्या समाधी नंतर महाराष्ट्रांत थोड्याच दिवसांत मुसलमानांची राजकीय सत्ता स्थापन होऊन श्रुतिस्मृतिप्रणीत धर्मा वर एक भयंकर संकट उपस्थित झालें. वेद, चातुर्वर्ण्यव्यवस्था यांची वाताहत होऊन श्रुतिस्मृतिधर्मानुयायी लोकांस प्रिय अशा ब्राह्मण, गाई, देवळें, देवता, तीर्थें, क्षेत्रें इत्यादिकांची विटंबना व पायमल्ली होऊं लागली. श्रुतिस्मृतिप्रणीत धर्म या संकटांत नष्ट होतो अशी

घास्ती वाटूं लागली. अशा प्रकारच्या परिस्थितींत उपासना, विठ्ठलभजन, विठ्ठलनामसंकीर्तन इत्यादि अत्यंत स्वल्प गोष्टींचा उपदेश महाराष्ट्रीय संतांनीं महाराष्ट्रीय जनतेस करून तिजला जेमतेम हिंदुधर्माचे गोटांत ठेविलें. वारकरी सांप्रदायी संतांनीं केलेल्या कामगिरीचें वास्तविक स्वरूप या प्रकारचें असल्या मुळें श्रुतिस्मृतिधर्मा विरुद्ध अगर सनातनधर्मा विरुद्ध वारकरी सांप्रदायाच्या पुढारी संतांनीं बंड केलें असें विधान करणें सयुक्तिक नाहीं. उलट या सांप्रदायांतील संतांनीं सनातन धर्माची पायमल्ली होत असल्या बद्दल खेद व्यक्त करणारे उद्गार काढिले असून श्रुतिस्मृतिप्रणीतधर्माच्या रक्षणार्थ अवतार घेण्या करितां परमेश्वराचा धांवा केलेला आहे. महाराष्ट्राच्या पारतंत्र्याची, वारकरी सांप्रदाच्या निर्मितीची व त्या सांप्रदायांतील संतांनीं केलेल्या कामगिरीची मीमांसा वास्तविक या स्वरूपाची असल्या कारणानें वरील अभिप्रायांत व्यक्त करण्यांत आलेल्या राजवाड्यांच्या मतांच्या सत्यते विषयीं चांगली च शंका निर्माण व्हावी हें स्वाभाविक आहे. समर्थ रामदास स्वामी यांनीं स्थापन केलेल्या सांप्रदायाच्या शिकवणीची महति वर्णन करीत असतां, वारकरी सांप्रदायी संतांच्या कृती विषयीं राजवाड्यांनीं या प्रकारचा अभिप्राय व्यक्त केल्या कारणानें वारकरी सांप्रदायाच्या संताभिमानी लोकांच्या मनांत साहजिक रीतीनें क्रोध उत्पन्न झाला. शिवाजी महाराजांनीं स्वराज्यस्थापनार्थ केलेल्या खटपटीस समर्थांचा व त्यांनीं स्थापन केलेल्या सांप्रदायाचा खरोखर च उपयोग झाला कीं काय, या विषयीं या लोकांच्या मनांत शंका उपस्थित होऊन शिवाजी महाराजांच्या कार्यास रामदासांचा म्हणण्या सारखा उपयोग झाला नाहीं, असें सिद्ध झाल्यास बरें च होईल असें त्यांस वाटूं लागलें. रामदासांची व वारकरी सांप्रदायाच्या संतांची शिकवण एकरूप असून शिवाजी सारख्या क्षत्रिय शिष्याची व समर्थांची,त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धांत गांठ पडल्या कारणानें समर्थांनीं, शिवाजी सारख्या क्षत्रिय शिष्यास उचित असा कर्मप्रधान उपदेश केला इतकेंच; या पेक्षां अधिक किंमतीचें कार्य समर्थांनीं अगर त्यांनीं अस्तित्वांत आणिलेल्या प्रचंड घटनेंत बध्द झालेल्या त्यांच्या शिष्यांनीं केलें नाहीं, अशा प्रकारचें मत प्रतिपादन करण्याची वारकरी सांप्रदायी संताभिमानी लोकांची प्रवृत्ति महाराष्ट्रांत उदयास आली. या विषयीं विस्तृत विवेचन करण्या पूर्वीं प्रथम या प्रश्ना संबंधीं कालानुक्रमा प्रमाणें झालेल्या चर्चेचें आम्ही दिग्दर्शन करितों.

राजवाड्यांनीं वरील प्रमाणें वारकरी सांप्रदायी संतांच्या कामगिरी विषयीं आपले विचार प्रदर्शित केल्या नंतर त्यांनीं व्यक्त केलेल्या अभिप्रायास उत्तरा दाखल रा. नारायणराव गद्रे यांनीं

" महाराष्ट्रमहोदयाचा पूर्वरंग " या नांवाचा एक ग्रंथ प्रसिद्ध केला. देवगिरीच्या यादवांचा पराभव होऊन त्यांचें राज्य नष्ट झाल्या पासून तों शिवाजी महाराज अवतीर्ण होई तोंपर्यंत वारकरी सांप्रदायाच्या संतांनीं महाराष्ट्रीय समाजाच्या व धर्माच्या रक्षणार्थ कोणत्या प्रकारच्या हालचाली केल्या, त्या च प्रमाणें विजयनगर येथें झालेली राज्यस्थापना व त्या घराण्यांत झालेले पुरुष यांनीं मुसलमान धर्माच्या हल्ल्या पासून सनातन धर्माचा बचाव करण्या करितां कोणत्या प्रकारचे प्रयत्न केले याचें साग्र व तपशीलवार वर्णन या ग्रंथांत रा. गद्रे यांनीं केलेलें आहे.

राजवाड्यांनीं वारकरी सांप्रदायाच्या संतांच्या कामगिरी विषयीं प्रतिपादिलेल्या मतांचा एकदेशीपणा दूर करण्यास, गद्रे यांनीं प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांतील विवेचन चांगलें उपकारक झालें. खुद्द राजवाड्यांच्या हि, संतांच्या कामगिरीच्या महत्वा विषयींच्या मतांत या नंतर स्थित्यंतर घडून आलें. मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या आठव्या खंडाच्या प्रस्तावनेंत मुसलमानी सत्ता महाराष्ट्रांत प्रस्थापित झाल्यावर त्या सत्तेचे परिणाम महाराष्ट्रीयांच्या नानाविध राष्ट्रीय व्यवहारां वर कशा प्रकारचे झाले, याचें चित्र राजवाड्यांनीं उत्तम प्रकारें रंगविलें आहे. या चित्रांत मुसलमानी अमला खालीं मराठी भाषेची दैना कशा प्रकारची झाली व तिच्या वर आलेल्या या संकटांतून तिला शाबूत टिकविण्याची कामगिरी वारकरी सांप्रदायाच्या संत मंडळींनीं कशा रीतीनें केली याचें राजवाड्यांनीं केलेलें खालील वर्णन वाचण्या सारखें आहे:—

" राज्यकर्त्यांत व आपणांत जाती संबंधानें व आचारा संबंधानें ज्या बाबतींत विशेष भेद मुळा पासून च होता, त्या धर्माची कास ह्या साधु ग्रंथकारांनीं धरिली; आचारानें व धर्मानें राज्यकर्त्या सारखें होऊन व त्यांच्याशीं तादात्म्य पावून राष्ट्रत्व नष्ट होतें हें ते पक्कें पणीं जाणत होते; तेव्हां धर्माच्या बाबतींत जित व जेते यांत मुळचा जमीनअस्मानचा भेद होता च, तो त्यांनीं आपल्या ग्रंथांत आणून स्वराष्ट्रीयत्व कायम ठेविलें. इ. स. १३१८ पासून १६५६ पर्यंतच्या ग्रंथकारांनीं धर्म संबंधीं ग्रंथरचना मराठींत कां केली याचें हें रहस्य आहे. तसें च बखरी व इतिहास न लिहितां त्यांनीं भारत, भागवत, व रामायण ह्यांचे च अनेक अनुवाद केले; याचें कारण असें आहे कीं, त्या पासून राष्ट्रांतील कुधारकांना परस्पर उखाळ्या काढण्यास तर संधि मिळत नाहीं आणि इतिहासाच्या अध्ययनापासून जो नैतिक फायदा व्हावयाचा तो

तर बरा च होतो. महाराष्ट्रांत बखरी १६५६ च्या पुढें निर्माण कां झाल्या व त्याच्या आधीं भारत व रामायण ह्यांतील कथा च मराठींत प्रचलित कां होत्या त्याचें कारण हें आहे. भारत रामायण व धर्म ह्यां वर झालेले मराठी ग्रंथ महाराष्ट्रांत गांवोगांव वाचीत आणि त्यांतील भाषा व्यवहारांतील फारशीमिश्रित मराठी भाषेला आवरून धरी. सारांश साधुसंतांचे ग्रंथ म्हणजे त्या वेळच्या फारशीमिश्रित घेडगुजरी मराठी बडबडी वर केवळ रामबाण औषध होतें."

( खंड ८ उपप्रस्तावना पान ७९ )

"मनुष्याची कर्तबगारी नमूद करण्याचें साधन भाषा होय. जेथें कर्तबगारी नाहीं तेथें भाषेनें नमूद तरी काय करावें ? मुसलमानी अमलांत मराठ्यांच्या सर्व राजकीय हालचाली बंद झाल्या; त्याबरोबर राजकीय वाङ्मयादि मराठींत व्हावयाचें बंद झालें. अशा अडचणींच्या प्रसंगीं महाराष्ट्रांतील साधुसंतांनीं हालचालीचें एक निराळें च स्थान उत्पन्न केलें; तें स्थान धर्म व भक्ति यांचें होतें. या स्थानांत राष्ट्रांतील सर्व लोकांचें एकीकरण करण्याचा ह्यांनीं प्रचंड उद्योग केला; व हा उद्योग लोकांना समजून देण्या करितां मराठी भाषेचा उपयोग केला म्हणजे मराठींत ग्रंथरचना केली."(उप प्रस्तावना पान९४.)

राजवाड्यांनीं वरील उताऱ्यांत वारकरी सांप्रदायांतील साधुसंतांच्या कामगिरीचें जें वर्णन केलें आहे त्या वरून साधुसंत हे निवळ पंगु कोटी पैकीं असून महाराष्ट्राच्या हिताची कोणत्या हि प्रकारची कामगिरी त्यांच्या हातून झाली नाहीं, या त्यांच्या पूर्व मतांतील अतिशयोक्तीचा भाग त्यांनीं सोडून दिला होता हें स्पष्ट दिसून येतें. स्वधर्म आणि स्वभाषा या दोन, कोणत्या हि राष्ट्राच्या चारित्र्याच्या अनेक अंगां पैकीं महत्त्वाच्या बाबी आहेत; व या बाबींच्या रक्षणाची जी महत्त्वाची कामगिरी वारकरी संतांनीं केली ती लक्षांत घेतली असतां त्यांना पंगूच्या कोटींत ढकलणें, हें न्यायाचें नाहीं हें कोणास हि कबूल करणें भाग आहे. राजवाड्यांना ही गोष्ट त्यांनीं व्यक्त केलेल्या अभिप्राया वरून पटली होती हें दिसून येत आहे. राजवाड्यांचा या प्रश्ना संबंधींच्या मतांचा एकदेशीपणा नाहींसा होऊन संतांच्या कामगिरीच्या महतीची वास्तविक कल्पना कशी स्पष्ट होत गेली हें आतां पावेतों केलेल्या विवेचना वरून स्पष्ट झालें आहे; तथापि समर्थ रामदासांनीं स्थापन केलेला रामदासी सांप्रदाय आणि छत्रपति शिवाजी महाराजांनीं केलेली स्वराज्य-स्थापना या दोहोंची निर्मिती, प्रसार व स्वराज्यस्थापनेंत परिणती या

बाबी एकसमयावच्छेदेंकरून महाराष्ट्रांत घडून आल्या कारणानें या उभयतांच्या ध्येयाचा व तें साध्य करण्या स्तव त्यांनीं केलेल्या हालचालींचा परस्परांशीं कांहींतरी संबंध असला पाहिजे, अशा प्रकारच्या महाराष्ट्रांत प्रचलित असलेल्या साधारण समजांत मात्र कांहीं स्थित्यंतर घडून आलें नाहीं. आठव्या खंडाच्या प्रस्तावनेंत राजवाड्यांनीं दर्शविलेला वर नमूद केलेला अभिप्राय प्रसिद्ध झाल्या नंतर या प्रश्ना संबंधीं उहापोह अगर चर्चा बरे च दिवस कोणीं केल्याचें आढळत नाहीं. शके १८३३ च्या सुमारास या प्रश्ना संबंधींच्या वादानें फिरून उचल खाल्ली. " श्रीसांप्रदायिक पत्रव्यवहार " या रामदास आणि रामदासी ग्रंथमाले पैकीं नवव्या भागांत रामदासी सांप्रदाया संबंधीं जो पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला आहे, तो प्रथम शके १८३३ च्या सुमारास कै० गोविंद काशिनाथ चांदोरकर यांस उपलब्ध झाला. रा. चांदोरकर हे वारकरी सांप्रदायाभिमानी असून राजवाडयांनीं व्यक्त केलेल्या मतांच्या योगानें त्यांचें मन दुखावलें होतें. समर्थ रामदास आणि छत्रपति शिवाजी महाराज यांची भेट पूर्व वयांत झाली नसून ती उत्तर वयांत झाली होती, अशा प्रकारचा सिद्धांत शाबीत झाल्यास तो चांदोरकरांना इष्ट होता. सतराव्या शतकांत झालेल्या मराठ्यांच्या उत्कर्षास वारकरी सांप्रदायाच्या संतांच्या शिकवणीचा ज्या प्रमाणें कोणत्या हि प्रकारचा उपयोग झाला नाहीं, त्या च प्रमाणें रामदासी सांप्रदायाच्या शिकवणीचा हि कोणत्या हि प्रकारचा उपयोग झाला नाहीं असें त्या काळच्या उपलब्ध झालेल्या पुराव्याच्या आधारें शाबीत करितां आलें तर चांदोरकरा सारख्या वारकरी सांप्रदायाभिमानी गृहस्थास ती इष्टापत्तीच वाटत होती. चांदोरकरांच्या हातीं हा पत्रव्यवहार पडतां च त्यांनीं तो तपासला; त्यांत त्यांना श्रीसमर्थांचीं दोन जुनीं चरित्रें पान ४८ वर छापिलेलें शके १५९४ चें पत्र आढळलें. त्या पत्रांत " राजे यांची पहिली भेट आहे; वाडीचें लोकांस खटपटेस आणावें. " असा उल्लेख आहे. या वरून समर्थ रामदास स्वामी व छत्रपति शिवाजी महाराज यांची प्रथम भेट शके १५९४ सालांत झाली असा चांदोरकरांनीं सिद्धांत ठरविला. हें पत्र चांदोरकर यांनीं वाचतां च त्यांच्या मनास प्रिय वाटणारी कल्पना सिद्ध करण्यास लागणारा भक्कम पुरावा उपलब्ध झाला असें वाटून त्यांनीं कोणत्या हि प्रकारचा अधिक शोध वगैरे न करितां केसरी वर्तमानपत्रांत हें पत्र प्रसिद्ध केलें; व त्यांत ह्या पत्रा संबंधीं केलेल्या विवेचनांत शके १५९४ पूर्वी समर्थ रामदास स्वामी व

छत्रपति शिवाजी महाराज यांची भेट च झाली नव्हती व त्या च सालांत त्यांची प्रथम भेट झाली असें प्रतिपादन केलें. या पत्रांतील समर्थशिवाजीसंबंधा विषयींची हकीकत खरी मानिली तर शिवाजी महाराजांचें स्वराज्य स्थापनेचें कार्य, समर्थांची व त्यांची भेट होण्या पूर्वी बहुतेक उरकून गेलें होतें असें सिद्ध होतें. ही च गोष्ट चांदोरकरांना इष्ट होती; व ती वरील पत्रा मुळें सहज च सिद्ध झाली असें म्हणण्यास त्यांना वाव मिळाली. चांदोरकरांनीं हें पत्र केसरींत प्रसिद्ध केल्या नंतर या बाबतींत समाधानकारक खुलासा करण्याचें काम राजवाड्यां वर येऊन पडलें. केसरींत पत्र प्रसिद्ध होण्या पूर्वी तें अस्सल पत्र राजवाड्यांनीं पाहिलें होतें. हें पत्र अस्सल पत्राची नक्कल होती. या शिवाय पत्रांतील शकाच्या आंकड्यां पैकीं सात हा आंकडा संशयास्पद होता; या दोषा मुळें या पत्रास कितपत महत्त्व द्यावयाचें हा मुद्दा राजवाड्यांनीं नमूद करून प्रथम भेट या शब्दाचा, एक विशिष्ट कालविभागांतील प्रथमभेट असा अर्थ समजावयाचा असा खुलासा केला आहे. समर्थशिवाजीसंबंधाच्या वादग्रस्त प्रश्ना विषयीं या प्रमाणें नूतन चर्चेस सुरवात झाल्या नंतर ह्या प्रश्नाचा समाधानकारक निकाल ज्या कागद-पत्रांच्या साह्यानें होऊं शकेल, अशा कांहीं कागदपत्रांचें संशोधन करण्याचें राजवाड्यांच्या मनांत येऊन त्यांनीं चाफळ खोऱ्या कडे सफर केली. त्या सफरींत त्यांना मिळालेल्या एका बाकेनिशी टिपणाच्या आधारें, त्यांनीं रामदास आणि रामदासी मासिकांत "छत्रपति शिवाजी महाराजांस रामदास स्वामींनीं अनुग्रह दिल्याचा नक्की काल" असा एक लेख छापून प्रसिद्ध केला. त्या नंतर रामदासी संप्रदायाचें ध्येय व रामदासी संप्रदायानें केलेलें कार्य ह्या विषयीं कांहीं महत्त्वाचे लेख राजवाड्यांनीं त्या च मासिकांत प्रसिद्ध केले. पुढें प्रोफेसर गोविंद चिमणाजी भाटे यांचें या प्रश्ना कडे लक्ष वेधलें गेलें व त्यांनीं 'सज्जनगड व समर्थ रामदास' या नांवाचा एक स्वतंत्र ग्रंथ छापून प्रसिद्ध केला. या प्रमाणें या वादग्रस्त प्रश्ना संबंधीं चर्चा चालू असतां रा. कृष्णराव केळुसकर यांनीं छत्रपति शिवाजी महाराज यांचें चरित्र छापून प्रसिद्ध केलें; त्यांत हि या वादग्रस्त प्रश्ना संबंधीं एक बाजू दिग्दर्शित करण्यांत आली आहे. आतां पावेतों या वादग्रस्त प्रश्ना संबंधीं महाराष्ट्रीय विद्वानांनीं केलेल्या चर्चेच्या इतिहासाचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे. या प्रश्ना संबंधीं मूळ वाद कसा उत्पन्न झाला याचें दिग्दर्शन वर केलें च आहे. या वादा संबंधीं जीं निरनिराळीं

मतें प्रतिपादण्यांत आलीं आहेत त्यांचें थोडक्यांत साकल्यानें दिग्दर्शन करणें जरूर आहे.

१ छत्रपति शिवाजी महाराजांस स्वराज्यस्थापन करण्याची स्फूर्ति रामदास स्वामींच्या उपदेशाच्या योगानें झाली.

२ रामदास स्वामी व शिवाजी महाराज या दोघांचें ध्येय एक च होतें व हें ध्येय निरनिराळ्या मार्गांनीं सिद्ध करण्याचे या उभयतांचे प्रयत्न स्वतंत्रपणें चालू असतां या उभयतांची गांठ पडून परस्परांच्या कार्यास परस्परांचे प्रयत्न पोषक झाले व दोघांचें ध्येय सिद्ध झालें.

३ रामदास स्वामींची व छत्रपति शिवाजी महाराजांची भेट, छत्रपतींनीं स्वराज्यस्थापनार्थ चालविलेले प्रयत्न बरे च सिद्ध झाल्या नंतर झाली; तों पावेतों परस्परांच्या ध्येयाची व तें ध्येय साध्य करण्या स्तव परस्परांनीं चालविलेल्या हालचालींची परस्परांस कोणत्या हि प्रकारची माहिती नव्हती व परस्परांच्या हालचाली परस्परांस पोषक झाल्या नाहींत. छत्रपति शिवाजी महाराज हे क्षत्रिय राजे असल्या कारणानें त्यांस त्यांच्या वर्णाश्रमधर्मास अनुसरून क्षात्रधर्माचा उपदेश समर्थांनीं केला, या पलीकडे परस्परांच्या हालचालींचा परस्परांस कांहीं एक उपयोग झाला नाहीं.

या प्रमाणें तीन प्रकारचीं मतें व तीं प्रतिपादन करणारे तीन प्रकारचे इतिहासाचे संशोधक व अभ्यासक आपल्या पुढें आले आहेत. समर्थसांप्रदायाभिमानी लोक पहिलें मत प्रतिपादन करणारे बहुधा आढळतात. समर्थसांप्रदायाभिमानी इतिहासाचे संशोधक व अभ्यासक दुसऱ्या प्रकारचें मत प्रतिपादन करणारे दिसून येतात. वारकरी सांप्रदायाभिमानी व नूतन अस्तित्वांत आलेल्या ब्राह्मणब्राह्मणेतर भेदा पैकीं ब्राह्मणेतर या संज्ञेनें जो पक्ष संबोधिला जातो त्यांना तिसरें मत पसंत आहे. हें मत पसंत पडण्यास वारकरी सांप्रदायाभिमानी व ब्राह्मणेतर लोक यांचीं कारणें मात्र भिन्न आहेत. वारकरी सांप्रदायांतील संत मंडळींस, पंगु ह्मटल्या मुळें राग येऊन रामदासांनीं स्वराज्य स्थापनेस अशी काय मोठी मदत केली कीं, तुह्मी त्यांच्या सांप्रदायास जयिष्णु ह्मणतां ? "समर्थसांप्रदायाची शिकवण स्वराज्यस्थापनेस उपकारक झाली हें मत निराधार व असत्य आहे." अशा प्रकारच्या विकारयुक्त भावनेनें वारकरी सांप्रदायाभिमानी वर नमूद केलेल्या तिसऱ्या सिद्धांताचें समर्थन करण्यास उद्युक्त झाले आहेत. जेथें ब्राह्मणांचा कांहीं संबंध येईल तेथें तो खोडून काढून ब्राह्मणांचा कोणत्या हि राष्ट्रीय हालचालींशीं संबंध नव्हता असें

सिद्ध करण्याची भावना, अलीकडे उपस्थित झालेल्या ब्राह्मणेतर नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या मराठा व इतर जातींतील कांहीं विद्याविभूषित लोकांत उत्पन्न झाली आहे; या भावनेनें प्रेरित झालेले लोक हि वर दर्शविलेल्या तिसऱ्या मताचें प्रतिपादन करीत आहेत.

अशा प्रकारची या वादग्रस्त प्रश्नाच्या चर्चे संबंधाची आजमिती पावेतोंची थोडक्यांत हकीकत आहे. " सांप्रदायिक विविध विषय " यांत प्रसिद्ध झालेल्या " छत्रपति शिवाजी महाराजांस रामदास स्वामींनीं अनुग्रह दिल्याचा नक्की काल " या राजवाड्यांच्या लेखाच्या शेवटीं श्री समर्थ रामदास स्वामी आणि छत्रपति शिवाजी महाराज यांच्या अन्योन्य संबंधा विषयीं त्यांनीं त्या लेखांत चर्चा करून लेखाच्या शेवटीं आपला जो अभिप्राय व्यक्त केला आहे, तो फार महत्त्वाचा असल्या कारणानें खालीं देत आहों:—

" शिवाजीचें समर्थोकडे लक्ष्य शके १५७१ च्या पूर्वी पांच चार वर्षे म्हणजे समर्थ कृष्णातीरीं येऊन थोडा काल गेल्यावर लागलें. आपल्या प्रांतांत व प्रांताशेजारीं कांहीं एका प्रकारची सुयंत्रणा करणारा कोणी तरी करामती पुरुष वावरत आहे, हें सुयंत्रणेचा स्वतः अभ्यास करणाऱ्या शिवाजी सारख्या कर्त्या धुरंधरास लवकर च कळावें यांत मोठेंसें नवल नाहीं. कळलें नसतें तर च तो चमत्कार म्हणावा लागता. ही शिवाजीच्या तर्फेची स्थिति झाली. समर्थांचें शिवाजी कडे लक्ष्य शक १५६६ च्या फार पूर्वी पासून लागलें होतें. प्रस्तुत स्मरणार्थ टिपणांतील १२ वें कलम पहा. त्यांत शके १५५४ त पुणें प्रांतांत शिवनामा अवतारी पुरुष निर्माण जाला आहे, ही वार्ता समर्थांस कळली, असें विधान केलें आहे. हें कलम अंताजी गोपाळानें उत्धवगोसाव्यांच्या टिपणां वरून घेतलेलें आहे. कारण, शक १५६६ पर्यंतचें गुप्त व स्पष्ट, मानसिक व शारीरिक चरित्र प्रथम शिष्य जो उत्धव त्यास सूक्ष्म अवगत होतें. शके १५५४ त शिवाजीचें वय ६ होतें त्या कालीं दादोजी कोंडदेव वगैरे जे कोणी स्वराज्याची उभारणी लहान्या शिवरायाच्या नांवानें करीत होते त्यांच्या परंपरित हस्तकांच्या द्वारां जाणत्या, विचारवंत व कार्यकर्त्या लोकांत बालशिवाजीच्या होतकरूपणाच्या वार्ता मंदगतीनें पसरूं लागल्या. त्या गतीची एक मंदतम लाट समर्थांस टाकळीस १५५४ त स्पर्श करिती झाली. तिचा उल्लेख उत्धव गोसाव्यांनीं आपल्या टिपणांत केला. त्याचा उद्धार अंताजी गोपाळानें केला. शक १५५४ तील ही शिववार्ता रिकाम्या वेळीं सुखसंकथा

करीत असतांना समर्थांनीं उत्तरवास कधीं तरी सांगितलेली आहे. बाल शिवाजीची लंगोटी फिटली नव्हती तेव्हां पासून जुनरा कडे, पुण्याकडे व कृष्णातीरा कडे समर्थांचें लक्ष्य लागलें. १५५४ त जुनरांत किंवा पुण्यांत येऊन जिजाबाई, दादाजी व शिवाजी यांच्या आश्रयानें त्यांचीं स्तुतिस्तोत्रें करण्याचा गांवढळ मार्ग न पत्करितां समर्थांनीं स्वतंत्र संस्था यांत्रिण्याचा पुरुषार्थ शक १५७१ पर्यंत केला. त्या च अवधींत पुण्या भोंवतीं व कृष्णेच्या पश्चिमेस निराळ्या तऱ्हेच्या संस्था यंत्रिण्यांत शिवराजाचा काल गेला. या दोन सुयंत्रणा एक च देश स्वतंत्रपणें व्यापूं लागल्या असतां, त्यांचा सुखस्पर्श एकमेकींस झाला. असा हा प्रकार आहे. ह्याचे धागे थोडेफार उकलत चालले आहेत, परंतु कालदूरत्वास्तव व लेखवैरल्यास्तव ही उकल समाधानकारक होण्यास श्रम व अवधि बेसुमार लागेल असा तर्क आहे. ”

वरील उताऱ्यांत राजवाडयांनीं व्यक्त केलेल्या अभिप्रायास धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक सभेनें प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांतील उल्लेखावरून चांगली च पुष्टि येत आहे. “ दासविश्रामधाम, ” “ समर्थप्रताप, ” “ सांप्रदायाचा पत्रव्यवहार भाग दुसरा ” इत्यादि ग्रंथ धुळ्याच्या सत्कार्योत्तेजकसभेनें अलीकडे छापून प्रसिद्ध केले आहेत. या ग्रंथांत या प्रश्ना संबंधीं प्रसिद्ध झालेली नूतन माहिती जमेस धरून या प्रश्ना विषयीं पुनर्चर्चा करण्याचा समय प्राप्त झाला आहे असें वाटून हा प्रबंध लिहिण्यास आम्ही प्रवृत्त झालों आहों. समर्थ रामदास स्वामी आणि छत्रपति शिवाजी महाराज यांच्या चरित्राची स्थूल माहिती वाचकांस आहे, असें गृहीत धरून या प्रबंधाची रचना केलेली आहे. या ग्रंथाच्या रचने विषयीं अल्प खुलासा करणें अप्रस्तुत होणार नाहीं. या पहिल्या भागांत या प्रश्नाच्या चर्चेचा आजपर्यंतचा इतिहास दिला आहे. दुसऱ्या भागांत आमचा साग्र प्रबंध छापिला आहे; तिसऱ्या भागांत दासविश्रामधाम आणि समर्थप्रताप या ग्रंथांत रामदास स्वामी आणि छत्रपति शिवाजी महाराज यांच्या संबंधा विषयीं व समर्थसांप्रदायाच्या ध्येया विषयीं आलेले उल्लेख संग्रहित केले आहेत. मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासकांस, त्या च प्रमाणें समर्थ रामदास स्वामी आणि छत्रपति शिवाजी महाराज या दोन अद्वितीय महाराष्ट्रीय विभूतींचा परस्पर संबंध कोणत्या प्रकारचा होता या विषयीं जिज्ञासा बाळगणाऱ्यांस हा प्रबंध उपयुक्त व्हावा हा हेतु पुढें ठेवून आतां दर्शविलेल्या प्रकारची या ग्रंथाची रचना केली आहे. इतका खुलासा केल्यानंतर हा भाग येथें पुरा करून दुसऱ्या भागांतील विषयाच्या विवेचनाकडे आम्ही वळतों.